


म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र. 302
REFBK-0010192

# मल्हारी मार्तंड

क्रमांक 3021 नों. दि. 26/1/1016

# मल्हारी मार्तंड

## खंडोबाची जेजुरी

शंभूराव रामचंद्र देवळे

REFBK-0010192

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
10162

किमत
६०
नये पैसे



वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.

सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन-माला : ५

सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन माला : ५

आवृत्ति पहिली
मे १९५८

किंमत ६० नये पैसे

महाराष्ट्रांतील सांस्कृतिक केन्द्रांचीं
ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं
भावरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें

प्रकाशक :
एम्. के. वोरा,
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
३, राउंड बिल्डिंग
काळबादेवी, मुंबई २.

मुद्रक :
अ. वि. रायरीकर
स्वस्तिक मुद्रणालय,
४३९ शनिवार, पुणें २.




## :१: मल्हारीची जेजुरी

कामाच्या घाईत रस्त्यानें चाललों होतों. रस्त्याच्या कडेला मुलांची गर्दी जमली होती. डोक्यावर मोरपिसांची टोपी, अंगांत पायघोळ असा तांबडा अंगरखा, पायांत घुंगरें, एका हातांत चिपळया, खांद्याला झोळी अडकवलेली, तिला एक अलगूज लटकवलेलें. तो वासुदेव होता आणि तालावर नाचत आणि चिपळया वाजवीत सुरावर म्हणत होता :

> दान पावलें ऽ दान पावलें ऽ
> पंढरीच्या विठ्ठलाला दान पावलें ऽ
> जेजुरीच्या खंडोबाला दान पावलें ऽ


वासुदेवाचे ते सुरांत ऐकलेले शब्द कानांवर पडले आणि पुढें पडलेलीं माझीं पावलें थबकलीं. मनांत विचार आला : महाराष्ट्रांत अनेक देवस्थानें आहेत. त्यांपैकीं पंढरीचा विठोबा आणि जेजुरीचा खंडोबा यांची मोहिनी लोकांच्या मनावर फार मोठ्या प्रमाणावर आहे. या दैवतांची भक्ति लक्षावधि लोक करतात. पंढरी आणि जेजुरी हीं बहुजनसमाजाची तीर्थक्षेत्रें आहेत. दरसाल हजारों भक्त पंढरीची वारी करतात, तसेच जेजुरीच्या यात्रेला जातात. असें आहे तरी काय या ठिकाणीं ? या खंडोबानें लोकांकरितां केलें तरी काय ? दैवतासंबंधीं

जुन्या दंतकथा कितीतरी असतात; पण त्या भाकडकथा चिकित्सक मनाला पटत नाहींत. पण ज्या अर्थी पिढ्यान्‌पिढ्या शेंकडों लोक खंडोबाचे गुण गातात आणि जेजुरीची यात्रा करतात त्याअर्थी तेथें कांहींतरी वैशिष्ट्य असलेंच पाहिजे. शिवाय जेजुरीचा खंडोबा हें आमच्याहि घराण्याचें कुलदैवत. तेव्हां मीं जेजुरीला जायचें ठरविलें.

चालतां चालतां मी बराच दूर गेलों होतों. ऊन झालें होतें. घाम निथळत होता. इतक्यांत वाऱ्याची एक झुळुक आली. जणूं तिनें माझ्या जेजुरीला जाण्याच्या निश्चयाला संमति दिली.

जेजुरीला जायला मीं रविवार निश्चित केला. पहांटे सहाला निघणाऱ्या एस्. टी. च्या पंढरपूर बसनें निघालों. जेजुरी हें क्षेत्र पुणें-पंढरपूर रस्त्यावर पुण्यापासून सुमारें चाळीस मैलांवर आहे. पुण्याहून निघालों कीं दिव्याचा घाट. घाट चढून गेलें कीं सोपानदेवांचें सासवड. आणि सासवड मागें टाकलें कीं आलेंच जेजुरी क्षेत्र.

✦ ✦ ✦



## :२: सोन्याची जेजुरी, गडाला नवलाख पायरी

मोटारींतून उतरण्याचा अवकाश. आमच्या भोंवतीं गर्दी जमली. " जय येळकोट मल्हार ! " पिवळा भंडारा लावलेला एक भक्त आमच्यापुढें आला. त्यानें आमची विचारपूस केली. " काय ? गडावर चलणार ना ? का आधीं कडेपठारावर येतां ? कोणत्या गांवाहून आला ? चला. आधीं घरीं चला. उतरायची सोय आहे. " त्याचा

पट्टा चालूंच होता. आम्ही गमतीनें त्याच्याकडे पहात होतों आणि पुढें चालत होतों.

बरोबर सोबतीला मित्र होते. म्हटलें, "चला, आधीं गडावर जाऊं. देवाचं दर्शन घेऊं. मग पुढचं पुढं." गांवांतल्या उंच-सखल रस्त्यानें आम्ही चाललों होतों. उन्हाळ्यामुळें सगळीकडे रखरखीत वाटत होतें. यात्रेचा दिवस नसल्यामुळें गांवांत सगळीकडे शुकशुकाट होता. वाटेंत कांहीं शाळकरी मुलें भेटलीं. त्यांच्याशीं बोलत बोलत गडाच्या पायथ्याशीं आलों. दाराशीं बेल, फुलें आणि दवणा घेतला.

पंढरीला तुळशी तसा जेजुरीला दवणा. विष्णूला तुळशी आवडतात, तसा खंडोबाला दवणा फार प्रिय आहे, असें म्हणतात. दवणा ही एक सुगंधी आणि औषधि वनस्पति आहे. खंडोबा हा वीरांचा देव. वीराला युद्ध प्रिय. युद्धांत चटकन् गुण देणारी वनौषधि म्हणून हा दवणा देवाला प्रिय झाला असेल.

भंडारा म्हणजे हळद. ही सुद्धां खंडोबाची आवडती वस्तु. हळदीचे औषधी गुण प्रसिद्ध आहेत; म्हणजे दवणा आणि हळद आवडणारा खंडोबा मोठा विचारी देव होता म्हणायचा !


आम्ही भंडारा विकत घेतला आणि पायऱ्या चढूं लागलों. तुम्हीसुद्धां वर जातांना भंडारा आणि खोबरें घेऊन चला. पण येथें भंडारा कागदांत नाहीं हं मिळायचा. अगदीं तुम्हीं कागद दिलात तरीसुद्धां नाहीं. येथें भंडारा खोबऱ्याच्या वाटींत देण्याची पद्धत आहे.

पायथ्याशीं असलेल्या या नंदीला नमस्कार करा आणि चढा गडावर. हा भिकारी काय गाणें म्हणतो आहे ?

"देवा तुझी सोन्याची जेजुरी
गडाला नवलाख पायरी."

ऐकलेंत, देवाची जेजुरी सोन्याची आहे आणि तिला नऊ लाख पायऱ्या आहेत. सोन्याची जेजुरी आणि नवलाख पायरी हें काय बरें असावें ? पहा, सगळीकडे कसें सोनेरी ऊन पडलें आहे. सगळीकडे जणूं देवाचा भंडारा उधळला आहे. देवाचें गांव असलेली जेजुरी

आपल्याला पवित्र वाटत असतें. कधीं नव्हे तें घडतें म्हणून मौल्यवान् वाटतें. हा सोन्याची जेजुरी याचा अर्थ असेल का ?



गडाचें प्रवेशद्वार

अबब ! किती प्रचंड पायऱ्या या. किती मजबूत बांधणी, चढायलाहि किती सुगम. वाहवा.

मघांशी ऐकलेला गाण्याचा चरण आठवला. मन गुणगुणत होतें, चरण चालत होते, डोळे तें सुंदर दृश्य पीत होते. गडाला पायऱ्या तर आहेत सुमारें तीनशें पंचाऐंशी.

" अहो, पायऱ्या नऊ लाख नाहींत, पण या मजबूत पायऱ्या बांधायला नऊ लाख चिरे लागले आहेत." आमच्याबरोबर चालणाऱ्या एका भक्तानें माहिती पुरविली आणि मग डोक्यांत प्रकाश पडला.

पायऱ्यांच्या दोन्ही बाजूंना दीपमाळांच्या रांगाच्या रांगा आहेत. पायथ्यापासून वरपर्यंतच्या वाटेवर सुमारें साडेतीनशें दीपमाळा आहेत. लहानमोठ्या, ओबडधोबड, घोटीव घडणीच्या, कितीतरी प्रकारच्या दीपमाळा आहेत या. निरनिराळ्या भक्तांनीं आपला नवस फेडण्यासाठीं

देवाच्या दारांत भक्तांना प्रकाश मिळावा, देवाचा मार्ग दिसावा म्हणून या दीपमाळा बांधल्या आहेत. या दीपमाळा म्हणजे जेजुरीचें वैशिष्ट्यच आहे म्हणाना. चढतां चढतां आपण चार टप्पे वर आलों. या निंबाच्या झाडाखालीं येथें काय आहे बरें ?

✦ ✦ ✦

## :३: पिता-पुत्रांची भेट

येथें निंबाखालीं या चबुतऱ्यावर हीं पावलें कुणाचीं बरें उमटलीं आहेत ? येथें एका अलौकिक पितापुत्रांची भेट झाली होती. सांगतोंच तें सारें. शिवाजी महाराजांनीं महाराष्ट्रांत आपल्या पराक्रमानें स्वराज्य संपादन करण्याला आरंभ केला होता. शहाजी राजे कर्नाटकांत होते, तरीसुद्धां आपल्या शूर पुत्राच्या पराक्रमाकडे त्यांचें लक्ष होतेंच. आपल्या मनांतील गोष्ट आपला पुत्र प्रत्यक्षांत आणीत आहे, हें पाहून कुणा बापाचें मन आनंदित होणार नाहीं ? अशा या पराक्रमी पुत्राला डोळे भरून पाहावें असें त्यांना वाटणें अगदीं साहजिक होतें. शिवाजी राजांच्या भेटीची ओढ शहाजी राजांच्या मनाला भारी लागली. शहाजी राजांनीं आपण भेटीला येणार, अशी खबर शिवाजी महाराजांकडे धाडली आणि कर्नाटकांतून पुण्याच्या मार्गावर ते तुळजापुराकडे निघाले.

तुळजापुराला शहाजी राजांनीं देवीचें दर्शन घेतलें. देवीपुढें खूप सोनें ठेवलें. मनोभावें देवीची प्रार्थना केली आणि आपल्या देशाची भरभराट मागितली.

तेथून शहाजी राजे निघाले, ते जेजुरीस आले. इकडून पुण्याहून शिवाजी राजे जेजुरीला सामोरे गेले. सुमारें बारा वर्षांनीं बापलेक भेटणार होते. पराक्रमी पुत्र पराक्रमी बापाला भेटणार होता. अशा वेळीं पाळायची एक रूढी आपल्याकडे आहे. बारा वर्षांनीं बापलेकांची

भेट व्हायच्या वेळीं एका काशाच्या पितळींत] तूप ओततात. त्यांत दोघांनीं एकमेकांचें रूप पाहून भेट घ्यायची. अशी ती पद्धत आहे. त्याप्रमाणें खंडोबाच्या देवळाजवळ इथेंच काशाची एक परात तुपानें भरली होती. तिच्यांत शहाजी राजांनीं शिवाजी राजांचें तोंड पाहिलें आणि शिवाजी महाराजांनीं आपल्या वडिलांचें तोंड पाहिलें. शिवाजी महाराजांनीं शहाजी राजांच्या पायांवर डोकें ठेवलें. शहाजी राजांनीं मोठ्या प्रेमानें त्यांना उठविलें. मग दोघेजण एक-मेकांना कडकडून भेटले. दोघांच्या डोळ्यांतून प्रेमाच्या अश्रुधारा वाहूं लागल्या ! मग शिवाजी महाराजांनीं शहाजी राजांना येथून पालखींत बसवून नेलें. शहाजी राजे पालखींत बसले. शिवाजी महाराजांनीं मोठ्या आदरानें त्यांचे जोडे आपल्या हातीं घेतले आणि ते पालखी-बरोबर पायीं चालूं लागले ( इ. स. १६६२ ). तीच ही जागा. त्याचेंच हें स्मारक. तो हा चबुतरा आणि तीं हीं धन्य पावलें !

✦ ✦ ✦

## :४: बाणाई आणि तिचा पाठीराखा हेगडे प्रधान

चला आतां वर जाऊं या. येथून गडावर जायला दोन मार्ग फुटतात. उजवीकडील मार्ग बाणाईच्या देवळावरून जातो.

बाणाई ही खंडोबाची दुसरी बायको. शंकराला दोन बायका. गंगा आणि गौरी. त्यांच्यांत नेहमीं भांडणें होत. तीं भांडणें जया नांवाची दासी सोडवीत असे. त्यामुळें जया सर्वांना आवडे; इतकी कीं अखेर गौरी आणि गंगा यांनीं तिला खुपीनें सवतीपण दिलें आणि शंकराच्या मल्लारि अवतारांत ती त्याची बायको बनली. लहान-पणीं बाणाईचा संभाळ धनगरांनीं केला होता म्हणून तिला धनगराची पोर म्हणतात. मल्लारीची दुसरी बायको म्हाळसा.

बाणाई मल्लारीची बायको होऊन आली तेव्हां मात्र म्हाळसेला तिचा सवतीमत्सर वाटला. मग मल्लारीच्या घरांत फार कटकटी



हेगडे प्रधान

वाढल्या. शेवटीं तडजोड झाली आणि बाणाईला गडाखालीं स्वतंत्र जागा मिळाली. गडावर देवळांत देवाशेजारीं म्हाळसा आणि गडाखालीं स्वतंत्र ठिकाणीं बाणाई. मल्लारीच्या कोणत्याहि स्थानीं बाणाईचें स्थान असें बाजूला असतें. मल्लारी देव दर रविवारीं बाणाईच्या भेटीसाठीं इथे येतो; बाकीचे दिवस म्हाळसेसह गडावर रहातो. बाणाईची मूर्तीहि केविलवाणी दिसली. बाणाईला शेळ्या आणि मेंढ्या

प्रिय. तेव्हां खंडोबाचे भक्त तिला नवस बोलतात, आणि बाणाई नवसाला पावली कीं, शेळ्या-मेंढ्यांच्या दगडी प्रतिमा करून तिला वहातात. बाणाईच्या देवळांत भक्तांनीं वाहिलेल्या शेळ्या-मेंढ्यांच्या प्रतिमांची मोठीच गर्दी आहे. बाणाईपर्यंतच यात्रेंत मेंढीच्या मांसाचा नैवेद्य येतो.

बाणाईच्या पाठीमागें हें बघितलेंत का छोटें मंदिर ? येथें हेगडे प्रधान व सरदार यांच्या उघड्या मूर्ती आहेत. बाणाईचें खंडोबाशीं लग्न श्रावण शुद्ध पौर्णिमेला नळदुर्ग येथें लागलें. लग्नानंतर मल्लारीनें बाणाईचा भाऊ हेगडे यास आपला प्रधान नेमलें. नंतर तो मल्लारी-बरोबर जेजुरीस आला. हें त्याचें स्थान.

✦ ✦ ✦

## :५: सव्वा लाखाचा भुंगा

देवाच्या महाद्वाराजवळ गणपती, नंदी आणि मारुतीहि आहेत. आणि उजवीकडे हें काय बरें आहे ?

याचें नांव आहे—" औरंगजेबाचा सव्वा लाखाचा भुंगा."

गडाच्या या भव्य तटाला हें एक लहानसें छिद्र आहे. याच छिद्रांतून पूर्वीं एकदां लक्षावधी भुंगे घोंगावत बाहेर आले होते.

त्याचें असें झालें :


इ. स. १६८३ चा सुमार होता. औरंगजेब साऱ्या सैन्या-निशीं महाराष्ट्रावर घाव घालीत होता. देवळें पाडीत होता. सगळीकडे हाहाःकार माजवीत फिरत होता. त्यावेळची गोष्ट.

औरंगजेबानें भुलेश्वरावर धाड घातली. देऊळ भ्रष्ट केलें. मग त्याची नजर जेजुरीकडे वळली. जेजुरीनजीक त्याचा तळ पडला आणि त्याचे सरदार तुकड्या तुकड्यांनीं गडाला उपद्रव देत सुटले. गडावर मुसलमानांचा हल्ला आला. रखवालदार यशवंतराव ठार झाला. गडा-वरच्या लोकांनीं महाद्वार बंद केलें. महाद्वार फोडायचें असा निश्चय

अनुक्रम ३७५२१ वि: ... क्रमांक ३०२ बॉ: दि: २८।१०

मुसलमान सरदारांनीं केला. आणि सुरुंग लावून तट उडवून देण्यासाठीं त्यांनीं पहारींनीं छिद्र तयार केलें. त्यांत दारू ठासणार तोंच—

मोहोळ डिवचलें म्हणजे मधमाशा जशा चवताळतात त्याप्रमाणें त्या छिद्रांतून टपोरे भुंगे बाहेर यायला सुरवात झाली. एक ना दोन! हजारों, लाखों भुंगे बाहेर आले आणि त्या मुसलमान सैन्यांतल्या प्रत्येक शिपायावर ते भुंगे तुटून पडले. 'गड नको पण भुंगा आवर' अशी त्यांची स्थिती झाली. भुंग्यांच्या चाव्यांनीं कांहीं मेले, कांहीं जखमी झाले, कांहीं हैराण झाले. पुढें सैन्य आणि मागें भुंगे असा पांच कोस पिच्छा पुरवला त्या भुंग्यांनीं !



सव्वा लाखाचा भुंगा

शेवटीं या कहाराचें कारण काय अशी मुसलमानांनीं चौकशी केली. मराठी सरदारांनीं सांगितलें, " हें जेजुरीचें दैवत भारी कडक आहे. तुम्ही देवळें भ्रष्ट करतां त्यामुळें देव कोपला आहे. आमच्या या देवाचा कोप घालवण्यासाठीं देवाला तुम्ही कांहीं दान कबूल करा. सव्वा लाख रुपये किंमतीचा एक भुंगा देवाला अर्पण करा म्हणजे हें संकट टळेल ! "

भुंग्यांच्या हाहाःकारानें हैराण झालेल्या मुसलमानांनीं औरंगजेबाकडून हें सारें करवून घेतलें. आणि आपल्या मागचा भुंगा सोडवल

सव्वा लाख किंमतीचा मुंगा देवाला अर्पण करून हात बांधून औरंगजेब आला, तें हें ठिकाण. याला तेव्हांपासून म्हणतात " सव्वा-लाखाचा मुंगा ! "

+ + +


## :६: देवळाच्या आवारांत

चला आतां या देवडींतून आंत जाऊं या. किती उंच आहे हा तट बांधलेला आणि किती प्रचंड आहे हें आवार ! आंत गेल्याबरोबर हा प्रचंड पुतळा दिसतो तो पाहा. हा नऊ फूट उंच आहे. हाच तो मणि दैत्य. त्याची कथा अशी आहे :

फार पूर्वी मणि आणि मल्ल हे दोन दैत्य बंधु होते. त्यांनीं मणिचूल पर्वताच्या आसपास राहणाऱ्या ऋषींना अतिशय त्रास दिला. तेव्हां ते ऋषि घाबरले आणि आपलीं मृगाजिनें सावरीत कैलासावरील शंकराला शरण गेले. ऋषि म्हणाले, " हे प्रभो, आमच्या आसपास राहणाऱ्या मणि आणि मल्ल या असुरांनीं आणि त्याच्या राक्षस-सैन्यांनीं आमच्या यज्ञवेदी पाडल्या, आमचे आश्रम जाळले, यज्ञकुंडें उद्‌वस्त केलीं. ऋषिपत्नी, ऋषिकुमार आणि समस्त जीवसृष्टि यांना झोडपून काढलें. म्हणून आम्ही तुला शरण आलों आहोंत. तेव्हां तूंच या संकटापासून आम्हांला वांचव. "

शंकर आपल्या सैन्यासह मणि आणि मल्ल यांच्यावर चालून गेले. मणि आणि मल्ल भयानक आवेशानें शंकरावर तुटून पडले. त्यांनीं आपली सर्व शस्त्रास्त्रविद्या पणाला लावली. पण शेवटीं शंकराचाच जय झाला. आपल्या पदाघातानें श्रीशंकरांनीं मणीस नमविलें आणि मल्लाचा वध केला.

मरणकाळीं मल्ल दैत्याची बुद्धि पालटली. त्याच्या मनांतला



मणि दैत्याचा पुतळा

वैरभाव नाहींसा होऊन तेथें भक्तिभाव उत्पन्न झाला. त्यानें शंकराला शरण येऊन वर मागितला, " देवा, आपला पाय असाच माझ्या माथीं असूं द्यावा आणि माझें नांव आपल्याशीं निगडित व्हावें." तेव्हांपासून शंकराला मल्लारि ( मल्ल+अरि ) म्हणूं लागले. मल्लारीचा 'मल्हारी' झाला. तोच हा मल्हारी किंवा खंडोबा. अशा प्रकारें मल्ल दैत्य मारला गेला, आणि मणि दैत्य शरण येऊन देवापुढें कायमचा उभा राहिला. त्याच मणि दैत्याचा हा पुतळा.

चला आतां पुढें. हें प्रचंड कासव पाहा. याचा घेर २९ फूट आहे. हें प्रचंड दगडी कासव पितळी पत्र्यानें मढविलेलें आहे. पण हें एवढें प्रचंड कासव देवळांत कशाला ? कांहीं जण म्हणतात, देवापुढें जातांना ताठ मानेनें न जातां नम्र होऊन कासवाप्रमाणें डोकें आंत घेऊन देवाला शरण जावें, हा संदेश देण्यासाठींच देवासमोर कासव असतें.


इतिहाससंशोधक त्याची व्युत्पत्ति पुढीलप्रमाणें सांगतात : देवाचे दोन भोग असतात. एक अंग-भोग आणि दुसरा रंग-भोग. देवाच्या अंगाला चंदनाची उटि लावणें, देवाची दहीभातानें पूजा बांधणें, हे देवाचे अंगभोग होत. देवापुढें कीर्तन करणें, गाणें, नाचणें हे देवाचे रंगभोग



मल्हारी मार्तंडाच्या गाभाऱ्यांत

होत. ही देवाची सेवा देवापुढें एका विशिष्ट शिलेवर उभें राहून करतात. या शिलेला रंगशिला असें म्हणतात. या रंगशिलेचेंच रूपांतर कांहीं काळानें पुढें देवापुढील कासवांत झालें.

देवळाच्या पुढें चार प्रचंड दीपमाळा आहेत. उत्सवाच्या वेळीं या दीपमाळांवर असंख्य दिवे लावतात. हें समोर मल्लारी मार्तंडाचें देऊळ. मंदिराच्या आंतला गाभारा इ. स. १३८१ च्या सुमारास वीरपाळ वीरमल्ल यानें बांधला. पुढली सदर आणि भोंवतालचा कोट इ. स. १६३४ च्या सुमारास खटाव येथील राघो बंबाजीनें बांधला.



आतां आपण देवळाच्या आंत जाऊं या. डावीकडल्या देवडींत थोडी नजर टाका. हें पाहिलेंत का नीट ! हा खंडोबाचा प्रसिद्ध खंडा. खंडा म्हणजे खड्ग. जरा हात लावून पाहा. किती जड आहे हें खड्ग. चार फूट लांब, साडे चार इंच रुंद आणि चाळीस शेर वजनाची ही अजस्र तलवार कोणाची ? आणि ती येथें कां बरें ठेवली आहे ? हेंच तें कालखड्ग. याच खड्गानें मल्लारि मार्तंडानें मणि आणि मल्ल यांचा पराभव केला. आतां हें प्रचंड खड्ग येथें कोपऱ्यांत विश्रांति घेत पडलें आहे.

आंत सभामंडपांत चला. डावी-उजवीकडे पाहिलेंत का ? हे प्रचंड दगडी घोडे पाहा. या उजवीकडच्या घोड्यावर स्वतः मल्लारि मार्तंड स्वार झालेले आहेत आणि डावीकडचा घोडा पाठीवर जीन घालून मोकळाच उभा आहे. म्हाळसेनें आपल्यावर स्वार व्हावें म्हणून तर हा येथें उभा नाहीं ना !

आतां गाभाऱ्यांत जाऊं या. गाभाऱ्यांत चौकोनी मेघडंबरी असून तिच्या खालीं चौकोनांत खंडोबा आणि म्हाळसा यांचीं स्वयंभू लिंगें आहेत त्यावर रुपेरी आच्छादनें घालून वर मुखवटे बसवतात. चौकोनाच्या डाव्या बाजूला बाहेर बाणाईचें स्वयंभू लिंग आहे. मात्र हें स्वयंभू लिंग बाजूला आहे. त्यावरहि आच्छादन व मुखवटा घालतात. या स्वयंभू लिंगांच्या मागें खंडोबा आणि म्हाळसा यांच्या उभ्या मूर्तींचे तीन जोड आहेत. दोन चांदीचे आणि तिसरा पितळी किंवा निरस सोन्याचा आहे. मूर्तींच्या हातांत त्रिशूळ, डमरु, खड्ग आणि परळ



गाभाऱ्यांतील खंडोबाची मूर्ति

(पाणी पिण्याचें भांडें) अशा चार वस्तू आहेत. म्हाळसेच्या उजव्या हातांत कमलकलिका असून डाव्या हाताची गजहस्त मुद्रा आहे. म्हाळसाकांत म्हणजे शंकराचा अवतार. त्याच्या कानांत खरीं म्हणजे सर्पकुंडलें पाहिजेत, पण येथें मकरकुंडलेंच आहेत. मूर्तींच्या पहिल्या जोडामागें वजन तोळे १५६१।। असें लिहिलें आहे. दुसऱ्या जोडाच्या मागें रुप्याची पाटी आहे. हा दुसरा जोड साताऱ्च्या छत्रपतींच्या वंशजांनीं अर्पण केलेला असावा. तिसऱ्या जोडाच्या मागें पुढील लेख आहे :

।। श्री मकर श्री ।।

श्री मालोजी भोसल्याचे उदरजलनिधि शाहशीतांशु झाला,
तद्गर्भीं येक राजा तयनवर तिघें त्यास दीपांबिकेला ।।

शाह क्ष्मापः शरीफावनिपसुगुण तुक्कोजि भूपार्कवंशी
खंडेराया स्वदेशा शरभनृपवरें स्थापिलें जेजुरीशीं ॥ १ ॥

यावरून हा तिसरा जोड व्यंकोजीपासूनचे राजे तंजावरास होते त्यांच्या वंशांतील शरीफजी अथवा शरफोजी यानें इ. स. १७११ ते १७२७ या काळांत जेजुरीला दिला असावा. इतिहास संशोधकांच्या मताप्रमाणें या मूर्ती गेल्या दोनतीनशें वर्षांतील असाव्यात.

या धातूच्या मूर्तींच्या मागें एका रुंद कोनाड्यांत आसनमांडी घातलेली खंडोबाची काळ्या पाषाणाची चतुर्भुज मूर्ति आहे. मूर्तीच्या एका हातांत त्रिशूळ, दुसऱ्या हातांत डमरू, तिसऱ्या हातांत परळ आणि चौथ्या हातांत खड्ग आहे. यांपैकीं परळ हें मूर्तीच्या अंगचेंच आहे. त्रिशूळ, डमरू आणि खड्ग या वस्तु सुट्या आहेत. त्यांपैकीं खड्ग हरवल्यामुळें तो हात सध्यां रिकामाच आहे. खंडोबाच्या दगडी बैठकीवर सूक्ष्म आणि डावीकडे जाणारा घोडा काढला आहे. खंडोबाच्या दोन्ही अंगांना दोन दगडी पुतळे असून त्यांना 'जोगेश्वरी' म्हणतात. दगडी मूर्ती मार्तंड भैरवाची आहे. खंडेरायाच्या मूर्तीच्या डोक्यावर शिंदेशाही पगडी असून अंगांत मोठा अंगरखा आहे.

हें वर पाहिलेंत का ? देवाचें सर्व सिंहासन, खांब, देवपाट सारें कांहीं चांदीच्या पत्र्यांनीं मढविलें आहे. कोणी केला हा सर्व खर्च ?

इ. स. १७७३ मध्यें नारायणराव पेशव्यांचा खून झाला. तेव्हां बारभाईनीं राघोबाविरुद्ध कारस्थान केलें. नारायणरावाची पत्नी गंगाबाई ही त्यावेळीं गरोदर होती. तिला जेजुरीच्या जवळच पुरंदरावर ठेवण्यांत आलें होतें. तिला मुलगा व्हावा म्हणून नाना फडणविसांनीं खंडेरायास नवस केला : " देवा, बारभाईच्या कारस्थानाला यश येऊं दे, गंगाबाईला मुलगा होऊं दे. तुला एक लाख रुपये वाहीन. " देव पावला. गंगाबाईला मुलगा झाला. तेव्हां नाना फडणविसांनीं नवस फेडला. एक लाख रुपये देवाच्या कारणीं लावले. पंचवीस हजारांच्या देवाच्या चांदीच्या मूर्ती बनविल्या, दगडी मंडपी रुप्यानें मढविली आणि उरलेल्या रकमेंत स्वयंभू लिंगावरील कवच, सोन्याचे मुखवटे आणि इतर राजोपचारांची सामग्री केली.

ज्या मूर्तीच्या दर्शनासाठीं समाजांतल्या सर्व थरांतले लाखों लोक महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांतून डोंगर चढून येतात, आणि आपलें माथें जेथें नमवितात, तीच ही खंडेरायाची मूर्ति. 'मल्हारी महात्म्यां'त तिचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे :


ध्यायेन्मल्लारिदेवं कनकगिरिनिभं म्हाळसाभूषितांकं ।
श्वेताश्वं खड्गहस्तं विबुधबुधगणैः सेव्यमानं कृतार्थैः ।।
युक्तांघ्रि दैत्यमूर्ध्नि डमरुविलसितं नैशचूर्णाभिरामं ।
नित्यं भक्तेषु तुष्टं श्वगणपरिवृतं नित्यमोंकारगम्यम् ।।

खंडेरायाजवळ म्हाळसा बसलेली आहे. खंडेरायाचें वाहन पांढरा घोडा आहे. त्याच्या हातांत खड्ग आहे. दैत्याच्या डोक्यावर त्यानें पाय दिलेले आहेत. त्याच्या एका हातांत डमरू शोभत आहे. त्याच्या सांगाती कुत्रे आहेत. हळदीमुळें त्याचें शरीर शोभून दिसत आहे. शहाणे लोक त्याची सेवा करण्यांत स्वतःला कृतार्थ मानतात. भक्तांवर ज्याची नित्य कृपा असते अशा त्या मल्लारिमार्तंडाचें नेहमीं ध्यान करावें.

आपणहि या मल्हारि मार्तंडाला साष्टांग नमस्कार घालून प्रदक्षिणा करण्यास निघूं या.

✦ ✦ ✦

## :७: प्रदक्षिणेच्या वाटेवर



घृतमारीची शीळा

खंडोबाच्या मागील बाजूला ओवऱ्यांतून आणि स्वतंत्र छोट्या देवळांतून आणखी कांहीं देव आहेत. एका ठिकाणीं तुळजाभवानी आहे. नंतर गणपती आहे. पुढें हें भंडारगृह. पाठीमागच्या बाजूला ही उमाजीची तालीम. ही जवळच येथें असलेली खिडकी पाहा. या खिडकींतून कडेपठारावरील खंडोबाच्या मूळच्या मंदिराचें दर्शन होतें.

ही येथली भव्य शिला पाहा. ही महामारी किंवा घृतमारी आहे. माणि-मल्ल राक्षसांचा वध करायला ज्यावेळीं शंकरानें अवतार घेतला त्यावेळीं त्यानें रागानें जटा आपटल्या. तेव्हां ती महामारी उत्पन्न झाली. तिला तूप पाजलें तेव्हां ती घृतमारी झाली. तिनें मार्तंड भैरवाला युद्धांत खूप मदत केली. मग ती येथें शांत झाली आणि भव्य शिळा होऊन पडली, असें म्हणतात.

पुढें जवळच एक महादेवाचें देऊळ आहे. त्याचें नांव पंचलिंगेश्वर. येथें महादेवाच्या पांच पिंडी आहेत. महादेवाचीं किंवा भैरवाचीं नीलाद्रि, काशी, मातापूर, हरिद्वार, जेजुरी अशीं जीं पांच प्रसिद्ध तीर्थें आहेत, त्या सर्व ठिकाणांच्या दर्शनाचें पुण्य येथें दर्शन घेतलें असतां मिळतें, असें म्हणतात. पंचलिंगेश्वराच्या देवळांत शिरतांना उजव्या बाजूला वर लेख आहे. त्यावरून हें मंदिर इ. स. १७५५ मध्यें विठ्ठल शिवदेव विंचूरकर यांनीं बांधविलें असावें असें दिसतें.

मंदिराच्या उत्तरेकडील ही ओवरी पाहा. हा दसरा दरबार. येथें दसऱ्याच्या उत्सवांत देवासमोर कोल्हाटी, मुरळ्या, घडशी, गोंधळी वगैरे लोकांचें गायन व नृत्य होत असतें.

चला आतां वर जाऊं. देवाच्या समोरील पूर्वेकडील ओवरीवर 'तळी भरण्याची' जागा आहे. तळी भरावयाची म्हणजे, ताटांत किंवा ताम्हणांत खोबरें आणि भंडारा घेतात, देवाची पूजा करतात. मग "खंडोबाचा येळकोट", "सदानंदाचा येळकोट" असा घोष करून त्रिवार तळी उचलतात, डोक्यावर घेतात आणि खालीं ठेवतात. मग भंडारा व खोबरें देवाकडे तोंड करून उधळावयाचें, वांटावयाचें, आणि प्रसाद म्हणून थोडें घ्यावयाचें. तळी भरणें हा येथील क्षेत्र-विधीच आहे म्हणाना.

इळा म्हणजे पृथ्वी आणि कोट म्हणजे पूर्णपात्र—येळकोट याचा अर्थ 'देवा, भरपूर अन्न पिकूं दे; मी पूर्णपात्र दान देईन,' ही घोषणा करून देवाजवळ सुबत्ता मागावयाची असा आहे.

या तटावरून देवाकडे पहात असतांना तो नंदीच्या डोक्यावर चबुतरा दिसतो ना, तेथें एक लांकडी खांब उभा आहे. त्यावर तें मोडकें चक्र कसलें आहे ? तो आहे गाडी बगाडाचा जीर्ण अवशेष. गाडी बगाड हा एक अघोरी प्रकार होता. पूर्वी लोक देवाला नवस करीत– " देवा माझी इच्छा पूर्ण होऊं दे. मी चंपाषष्ठीला तुझ्याजवळ येऊन बगाड घेईन. " बगाड घेणें म्हणजे एका खांबाला एक गळ बांधायचा. तो आपल्या पाठींत खोचून घेऊन लोंबकळत गाडीच्या चाकाप्रमाणें फिरायचें. हें चालू असतांना रक्ताचा सडा पडे. हा अघोरी प्रकार पुढें इंग्रज सरकारनें कायद्यानें बंद केला.

✦　✦　✦

## :८: गडाच्या आवतीं भोंवतीं

आपण ज्या तटावरून आतां हिंडत आहोंत, तो एके काळीं नादुरुस्त झालेला तट पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनीं इ. स. १७४२ ते १७७७ या काळांत पुन्हां बांधला.

या उंच तटावरून आतां आपण भोंवतालचें सृष्टिसौंदर्य पाहूं.

हा पश्चिमेकडे दूर डोंगरावर इंद्रकीलगिरी किंवा पुरंदर किल्ला. समुद्रसपाटीपासून तो ४४७२ फूट उंचीवर आहे. त्याचा घेर सुमारें चार मैलांचा आहे.

याच्या आसपासच्या डोंगरांच्या आश्रमानें उमाजी नाईक रहात होता. डोंगराच्या कडेकपाऱ्यांत राहून त्यानें इंग्रजी फौजेला जर्जर केलें. तो मोठा धाडसी वीर होता, श्रीमंतांचा कर्दनकाळ व गरिबांचा कनवाळू होता, मल्लारीचा निष्ठावान भक्त होता. त्याची सामेवताची जेजुरी-वारी कधी चुकली नव्हती. इंग्रजांनीं फितुरीनें त्याला पकडलें आणि इ. स. १८३२ मध्यें फांशी दिलें.

गडाच्या उत्तरेकडे ती हिरवीगार दाट झाडी दिसते ना, तेथें आहे कऱ्हा नदी. कऱ्हा नदी म्हणजे जेजुरीची गंगाच. ती ब्रह्मगिरीपासून

निघून पूर्वेकडे वाहाते. जेजुरीचा खंडोबा देव दर सोमवती अमावास्येला पालखींतून कऱ्हा नदीवर स्नानाला नेतात.

येथून जवळच कऱ्हा नदीच्या कांठींच दाट झाडींत मोरगांव आहे. तेथें गणपतीचें प्रसिद्ध देवस्थान आहे. आतां गडावरून दक्षिणेकडे जो भाग दिसतो ती जुनी जेजुरी. पूर्वी त्याचें जेजेवाडी असें नांव होतें. आतां तेथें फक्त पडके अवशेष आहेत. गडाच्या पूर्वेला जुन्या जेजुरीजवळ जो अष्टकोनी तलाव दिसतो तो शाहूराजांनीं बांधलेला तलाव. तेंच 'मल्हारी तीर्थ.' पूर्वी तेथें भरपूर पाणी होतें, पण आतां तो गाळानें भरून गेला आहे. तेथून गडावर येण्यास पायऱ्याहि बांधलेल्या दिसतात. हा गडाचा पूर्व दरवाजा. पण तो आतां बंद करण्यांत आला आहे.

गडाच्या पश्चिम दरवाजाजवळ पाण्याची बारव आहे. या पश्चिम दरवाजानेंच सुमारें शंभर वर्षांपूर्वी दरवडेखोरांनीं मंदिरावर दरोडा घातला. अहमदनगरचा राघू भांगरे हा जबरदस्त कोळी असामी होता. तो एका जमादाराचा तरणाबांड पोरगा. त्यानें इंग्रजांविरुद्ध बंड पुकारलें. आपल्याभोंवतीं तरुण लोक गोळा केले. श्रीमंतांची लूटमार करायची आणि गरिबांना ती वांटून द्यायची असा त्याचा कित्ता होता. तो खंडोबाचा मोठा भक्त होता. तो गळ्यांत खंडोबाचा ताईत बांधी. पण त्यानें देवळांत सांचलेली संपत्ति लुटण्यासाठीं देवळावरच डाका घातला. राजेरजवाड्यांनीं वाहिलेले श्रीमंती अलंकार, देवाच्या चांदीच्या मूर्ती, औरंगजेबानें वाहिलेला तो सव्वा लाखाचा भुंगा असें सारें जडजवाहीर राघू भांगऱ्याच्या टोळीनें लुटून नेलें. पण देवाच्या जड जड मूर्ती त्यांना पळवून नेतां येईनात म्हणून त्यांनीं त्या शेतांत पुरून ठेवल्या. पुढें बारा वर्षांनीं बेलसरच्या एका शेतकऱ्याला नांगरतांना म्हाळसेची मूर्ति सांपडली; तेव्हां वाजत गाजत आणून लोकांनीं ती पुन्हां देवळांत बसविली.

आणखी असाच एक प्रसिद्ध दरवडा येथें सन १९४४ सालीं पडला. त्या वेळींहि दरवडेखोरांनीं देवाचा भांडारखाना फोडून देवाचा मौल्यवान ऐवज लांबविला.

पश्चिमेच्या बाजूला हा पाण्याचा तलाव दिसतो तो ‘ होळकर तलाव. ’ सुमारें पंधरा एकर जागेवर बांधलेला हा सुंदर तलाव सुमारें दोनशें वर्षांपूर्वीं होळकरांनीं बांधला. यासाठीं त्या काळीं सुमारें अठरा लाख रुपये खर्च आला. या तलावानें जेजुरीला कायमचें जीवनदान मिळालें आहे. त्या तलावाच्या कांठीं अहिल्याबाईनें मल्हारगौतमेश्वराचें देऊळ बांधलें. मल्हार गौतमेश्वराच्या देवळांत शंकराची उत्कृष्ट पिंडी आहे. शंकराच्या पिंडीमागें श्रीमंत मल्हारराव होळकर, त्यांच्या मातोश्री आणि गौतमाबाई, द्वारकाबाई व बनाबाई या तीन बायका यांच्या मूर्ती आहेत. मल्हारगौतमेश्वरापुढील नंदी भव्य आणि प्रेक्षणीय आहे.

✦ ✦ ✦

## :९: कडेपठारावर

आतां आपण गडाच्या पश्चिम दरवाजानें खालीं उतरूं आणि कडेपठारावर जाऊं. कडेपठार हें खंडेरायाचें वास्तव्याचें मूळ ठिकाण. तें जेजुरीच्या नैर्ऋत्येस सुमारें चार मैलांवर आठशें फूट उंचीवर आहे. रस्ता ओबडधोबड आणि टेकडीवरून गेलेला असा आहे.

उन्हाची वेळ आहे. सगळीकडे रखरखत आहे. टेकडीवर भोंवतालीं सांवलीसाठीं झाडेंसुद्धां दुर्मिळ आहेत. अंगांतून घाम निथळत आहे. जरा पाऊल उचला म्हणजे आपण लवकर पोहोंचूं.

हा भोंवतालचा जो उजाड प्रदेश आहे, त्याच ठिकाणीं फार पूर्वीं ऋषिमुनींचे आश्रम होते. ते नदीकांठीं स्नानसंध्या करीत, यज्ञ-याग करीत, ईश्वराची उपासना करीत, डोंगरांतील कंदमुळांवर आपली उपजीविका चालवीत. त्यांच्या या तपस्वी जीवनांत मणि आणि मल्ल या दोन दैत्य बंधूंनीं व्यत्यय आणला. ऋषिमुनींचा राक्षसांकडून होणारा संहार टाळण्यासाठीं कैलासनाथ शंकरानें या भागांत अवतार घेतला तो खंडोबा. कडेपठार ही त्याची मूळची जागा.

एके काळीं वृक्षलतांनीं समृद्ध असलेला हा प्रदेश आज इतका उजाड कां बरें झाला ? आजकालच्या कोणा राक्षसांनीं येथील सारी

झाडी तोडून आपलें पोट जाळण्यासाठीं नेली कीं काय ? का पर्जन्य-दैवत जो इंद्र त्यानें या भागावर अवकृपा केल्यामुळें येथल्या सर्व वन्य वनस्पती जळून गेल्या ?

विचाराच्या या तंद्रींत आम्ही अर्धा डोंगर चढून आलों. वाटेंत आम्हांला भंडारा उधळल्यामुळें पिवळी झालेली खडकाळ जागा दिसली. बरोबरच्या मार्गदर्शक भक्तानें सांगितलें, " या स्थळाला ' घोडे उड्डाण ' म्हणतात."

जुन्या काळची गोष्ट. सुपें गांवांतील खैरे पाटील यांच्या वंशांतील एक पुरुष खंडोबाचा मोठा भक्त होता तो दर रविवारीं सुप्याहून निघायचा, वाटेंत कऱ्हा नदींत स्नान करायचा आणि कडेपठारावर जाऊन खंडोबाचें दर्शन घ्यायचा. तेथें कडेपठारावर खंडेरायाचें मूळचें स्थान. त्याचा हा नियम कित्येक वर्षें चालू होता. म्हातारपण आलें, शरीर थकलें, तरी त्याचा हा नेम चालूच होता. एके दिवशीं कडेपठार चढत असतांना अर्ध्या वाटेवर उन्हाची तिरीप लागून त्याचे हातपाय लटपटले आणि तो खालीं पडला. " देवा, थकलों मी आतां. आतां तुझं दर्शन मला कसं रे होणार ? " असें तो देवाला काकुळतीनें विनवीत आहे तोंच पांढऱ्या शुभ्र अश्वावर आरूढ झालेली मल्लारि मार्तंडाची मूर्ति त्याच्यापुढें उभी राहिली. मल्लारि मार्तंड म्हणाले, " माझ्या भक्ता, तुला इतकें लांब यायचा त्रास आतां नको. हा पाहा तुझ्या-साठीं मी गांवाजवळच्या छोट्या टेकडीवरच येऊन रहातों. "खंडोबाच्या तोंडून हे शब्द बाहेर निघतात न निघतात तोंच देवाच्या घोड्यानें उड्डाण केलें आणि गांवाजवळची टेकडी गांठली. ज्या खडकावरून देवाच्या घोड्यानें उड्डाण केलें ती ही जागा—'घोडे उड्डाण.'

भक्त खैरे पाटील तेथून तडक जेजुरीजवळच्या छोट्या टेकडीवर आला. तेथें त्याला म्हाळसा आणि मल्लारि मार्तंड यांचीं स्वयंभू लिंगें आढळलीं. त्याचा आनंद गगनांत मावेना. त्यानें जेजुरींतील गांवकऱ्यांना बोलावून घडलेली हकिकत सांगितली. लोकांना अतिशय आनंद झाला. खैरे पाटलाचें निमित्त घडलें आणि आपणां-

सर्वांची सोय झाली, असें लोकांनीं जाणलें. यानंतरच्या काळांत गडावरील देऊळ, दीपमाळ, पायऱ्या, तट वगैरे बांधकाम झालें.

घोडेउड्डाणाच्या जागेपासून आतां आपण कडेपठारावर जाऊं. पठारावर प्रथम छोटेंसें रामाचें देऊळ लागतें. तेथून पुढें खंडोबाचें देऊळ लागतें. देवळांत एकमेकांना लागून असलेलीं दोन स्वयंभू लिंगें आहेत. आणि त्यापासून सुमारें एक हात अंतरावर तिसरें लिंग आहे. जवळजवळ आहेत तीं मल्लारि आणि म्हाळसा यांचीं आणि थोडें बाजूला आहे तें बाणाईचें. जवळच खंडोबा आणि म्हाळसा यांच्या पितळी मूर्ति आहेत. मागें सुमारें तीन फूट उंच आणि पावणेदोन फूट रुंद अशी खंडेरायाची काळ्या पाषाणाची आसनमांडी घातलेली मूर्ति आहे. तिच्या बैठकीच्या डाव्या बाजूला मणि आणि मल्ल यांचीं मुंडकीं दाखविलीं आहेत. मूर्तीला चार हात असून एका हातांत खड्ग, दुसऱ्या हातांत त्रिशूळ, तिसऱ्या हातांत डमरू आणि चौथ्या हातांत परळ अशा वस्तू आहेत. परळ मूर्तीच्या अंगचेंच आहे, खड्ग लोखंडी आहे, तर त्रिशूळ आणि डमरू पितळी आहेत. खंडेरायाच्या मूर्तीच्या डोक्यावर शिंदेशाही पगडी आणि अंगांत अंगरखा घालतात. मूर्तीच्या दोन्ही बाजूंना दोन उभ्या दगडी स्त्री-मूर्ती आहेत, त्यांना बाणाई आणि जोगेश्वरी म्हणतात.

कडेपठाराहून परत जातांना दोन डोंगरांच्या मध्यें एक छोटी दरी आहे. तेथें जानाईचें देऊळ आहे. गुढी पाडव्याच्या आदल्या दिवशीं जेजुरींतले लोक येथें जमतात. लहान लहान वाफे तयार करतात. त्यांत वेगवेगळीं धान्यें पेरतात. मग पाडव्याच्या दिवशीं तेथें पुन्हां येतात. गांवकऱ्यांच्या देखत पाटील वाफे उकरतो. यावेळीं ज्या धान्याचा मोड जोरदार निघेल तें धान्य यंदा जास्त पिकेल असा खंडोबाचा कौल मिळाला, असें म्हणतात. या चालीला 'गुळ्या काढणें' असें म्हणतात.

कडेपठारावरील मल्लारि मार्तंडाच्या मूळच्या स्थानाचें दर्शन घेतलें म्हणजे जेजुरीची यात्रा पूर्ण झाली असें समजतात.

✦ ✦ ✦

## :१०: यात्रा आणि उत्सव

मल्लारि मार्तंड ही सकाम भक्तीची देवता आहे. मनांतील इच्छा पूर्ण होण्यासाठीं देवाला नवस करायचा, जेजुरीला खेटे घालायचे म्हणजे पुनः पुनः ठराविक दिवशीं दर्शनाला जायचें, आणि इच्छा पूर्ण झाल्यावर नवस फेडायचा अशी पद्धत असते. पाण्याच्या घागरी आणून देवाला घालणें; तळी भरणें; दहीभाताची पूजा देवाला बांधणें; भरीत, रोडगा, पुरणपोळी इत्यादि अन्नपदार्थांचा नैवेद्य देवाला दाखविणें; ब्राह्मण, गुरव, देवाचे भक्त, यांना अन्नदान करणें; देवाला प्रदक्षिणा घालणें; वारी मागणें म्हणजे देवाच्या नांवानें भिक्षा मागणें; लंगर तोडणें, दीपमाळ बांधणें, पायरी बांधणें वगैरे अनेक प्रकारचे नवस असतात.

जेजुरीला चंपाषष्ठी, सोमवती अमावास्या, चैत्री, श्रावणी, पौषी आणि माघी या चार पौर्णिमा यावेळीं विशेष उत्सव होतात आणि यात्रा जमते.

चंपाषष्ठी हा महत्त्वाचा उत्सव. मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदेला घट बसतात. माळा, नंदादीप, फुलोरा, पूजा, आरती वगैरे कार्यक्रम पांच दिवस होतो. पंचमीच्या दिवशीं तैलोत्सव म्हणून एक कार्यक्रम असतो. पंचमीच्या रात्रीं गडावरून मोठा हंडा खालीं गांवांतील चावडींत आणतात. तेथें लोक यथाशक्ति त्यांत तेल घालतात. मग तेलानें भरलेला तो हंडा वाजत गाजत गडावर देवळांत नेतात आणि हंड्यांतील तेल देवाला अर्पण करतात. या कार्यक्रमाला तैलोत्सव अथवा तेलवण असें म्हणतात. चंपाषष्ठीला कुळधर्माचा महानैवेद्य होतो. मग देवदर्शन, पालखी, कुस्त्या, शोभेचें दारूकाम वगैरे कार्यक्रम होतात.

याखेरीज चार पौर्णिमांचे उत्सव असतात. चैत्री पौर्णिमेच्या दिवशीं देवानें मणि-मल्लांना मारण्यासाठीं मार्तंड भैरवाचा अवतार घेतला म्हणून उत्सव करतात. श्रावणी पौर्णिमेस मल्लारि आणि बाणाई यांचा विवाह नळदुर्ग येथें झाला. त्याचें स्मरण म्हणून हा उत्सव करतात.

पौषी पौर्णिमेला मल्लारि आणि म्हाळसा यांचा विवाह उत्तर सातारा जिल्ह्यांतील पाली या गांवीं झाला. पौषी पौर्णिमेचा उत्सव म्हणजे या लग्नाची आठवण होय. माघी पौर्णिमेला मल्लारीची पत्नी म्हाळसा हिचा जन्म नेवासें येथें झाला. माघी पौर्णिमेचा उत्सव म्हणजे म्हाळसेच्या जन्मदिवसाचा उत्सव. सोमवती अमावास्येला जेजुरीला मोठी यात्रा भरते. या दिवशीं देव पालखीनें कऱ्हा नदीवर स्नानाला जातात.

जेजुरीचा दसरा मोठ्या थाटाचा असतो. रात्रीं गडावरून एक आणि कडेपठारावरून दुसरी अशा दोन पालख्या मोठ्या थाटानें वाजतगाजत निघतात. पायथ्याशीं रमण्यांत दोन्ही पालख्यांची भेट होते. शोभेची दारू उडविली जाते. देवाच्या अंगावर भंडारा आणि खोबरें उधळलें जातें. रात्रभर जागरण, नाच, गाणीं होतात. दुसरे दिवशीं सकाळीं देवाचे पुजारी भक्तांना 'रोजमुरा' वांटतात. रोजमुरा म्हणजे भंडाऱ्यांत जोंधळ्यासारखें एकादें धान्य मिसळून तें वांटतात. तो प्रसाद म्हणजे हा रोजमुरा. तो भक्तलोक आपापल्या घरीं आणून धान्याच्या कोठारांत टाकतात.

अशा प्रकारें निरनिराळ्या उत्सवांच्या वेळीं जेजुरी गांवांत मोठी यात्रा भरते. आणि त्या यात्रेला समाजांतील सर्व थरांचे लोक येतात.

✦ ✦ ✦

## :११: वाघे आणि मुरळ्या

खंडोबाच्या येथील भक्तांना वाघे म्हणतात. त्यांच्या गळ्यांत व्याघ्रचर्माची एक पिशवी व त्यांत भंडारा भरलेला. तेव्हां साहजिकच वाटतें कीं हे वाघे आणि वाघ यांचा कांहींतरी संबंध असेल. पण तसें कांहींच नाहीं. वाघाचा आणि यांचा कांडीचा संबंध नाहीं. कानडींत वग्गे म्हणजे भक्त असे म्हणतात. खंडोबा हें दैवत कानडी मुलखांतहि आहे. त्याचे वग्गे हे भक्त. या वग्ग्यांचे आपल्याकडे झाले वाघे. हे वाघे म्हणजे त्यांच्या आईबापांनीं नवसानें मागून

घेतलेले आणि त्यांनीं देवाला वाहिलेले मुलगे. देवाच्या नांवानें यांनीं जगायचें–म्हणजे काय, तर भीक मागायची. त्यांचा सारा जन्म असाच जायचा !

अशा नवस करणाऱ्यांत कांहींनीं मुली मागून घेतल्या. त्यांनाहि देवांना वहाण्यांत आलें. त्या झाल्या मुरळ्या ! त्यांचें लग्न देवाशीं लागे आणि मग त्याहि भीक मागत देवाच्या नांवावर जगूं लागल्या. त्या तरी माणसेंच ना ? साऱ्या विकारांनीं घेरलेल्या त्या अनाचाराच्या खाणी ठरल्या. आणि अशा रीतीनें वाघे आणि मुरळ्या यांचा अनाचार सर्वत्र सुरू झाला.

पण ही चाल वाईट आहे, बंद व्हावयास पाहिजे असें कुणाला वाटेना. अनेक साधुसंतांनीं या कुमार्गावर कोरडे ओढले. आपल्या इकडील संतांनीं तर या चालीचे वाभाडे काढलेच. पण बंगाल्यांतील साधु इकडे आले त्यांनींसुद्धां—

म्हणजे त्याचें असें झालें. बंगाल्यांत श्रीगौरांग प्रभु चैतन्य नांवाचें थोर हरिभक्त होऊन गेले. त्यांचा जन्म बंगाल्यांत नवद्वीप या खेड्यांत इ. स. १४८५ मध्यें झाला. पुढें ते जगन्नाथपुरी येथें १५३३ मध्यें ते परमेश्वररूपीं विलीन झाले. इ. स. १५१० ते ११ च्या सुमारास तीर्थयात्रा करतां करतां हा थोर संत जेजुरीस आला. वाघे-मुरळ्यांची ही पतित स्थिति पाहून चैतन्यांचें मन कळवळलें. “ प्रत्यक्ष पोटच्या गोळ्यांची ही अवस्था करणारे बाप किती निष्ठुर असले पाहिजेत ! ” असें ते म्हणाले. ते प्रत्यक्ष या मुरळ्यांच्या गल्लींत निघाले. त्यांना उपदेश करून सन्मार्गास लावण्याचें त्यांनीं ठरवलें. गांवांतल्या लोकांनीं चैतन्यांना त्या धार्मिक रूढीचा अर्थ सांगितला. धाक घातला, त्यांचें वर्तन धर्मबाह्य होईल असें बजावलें. पण चैतन्यांचा निश्चय फिरला नाहीं. चैतन्य मुरळ्यांच्या वस्तींत गेले. ते म्हणाले, “ भगिनीनो ! हरिनाम घ्या. हरि दयेचा सागर. कृष्ण सकल जगाचा स्वामी आहे. म्हणा – हरे कृष्ण, हरे कृष्ण. ” आणि चैतन्य नामसंकीर्तनांत नाचूं लागले. देहभान विसरले. साऱ्या मुरळ्या जमा

झाल्या. त्यांच्या मनांतला सदाचार जागा झाला. धर्माचें खरें स्वरूप चैतन्यांनीं त्यांना सांगितलें. कांहींनीं आपलें मुरळीपण सोडलें. चैतन्यांच्या उपदेशाप्रमाणें त्या वागूं लागल्या. पुढें चैतन्य गेले पण ही रूढी पुन्हां कायमच ! शेवटीं कायद्याचा बडगा जेव्हां दाखवला गेला तेव्हां ही दुष्ट रूढि बंद पडली.

✦ ✦ ✦

## :१२: असें हें मल्लारी दैवत

देवाचें दर्शन तर झालें. आतां माझ्या मनांत विचार आला. खंडोबाचें महत्त्व आपल्या महाराष्ट्रभर केवढें आहे ! ह्या खंडोबाचीं नांवें तरी किती तरी. खंडोबा, खंडेराय, खंडेश्वर, मल्लारि, मार्तंड, म्हाळसाकांत ! प्रत्येक नांवांत कांहींतरी कथा असणारच. कुणी म्हणतात, खंडोबा म्हणजे स्कंदोबा म्हणजे स्कंद. पण हें पटत नाहीं. स्कंद म्हणजे कार्तिकेय; शंकराचा मुलगा. त्यानें जर लग्नच केलें नाहीं, तर त्याला एक सोडून दोन बायका कुठल्या ? छे ! कांहींतरीच वाटतें. खड्ग धारण करणारा म्हणून खड्गेश्वर, खंडेश्वर असेलहि. पूर्वीं मल्ल नांवाचा दैत्य होता त्याला याच दैवतानें ठार मारलें म्हणून त्याला मल्लारि असें नांव पडणें अगदीं बरोबर वाटतें; नाहीं का ? तसेंच मल्लारिबरोबर मल्लारि मार्तंड म्हणतात. मार्तंड म्हणजे सूर्य. आपल्याकडे सूर्याच्या पूजेचें फार महत्त्व आहे. त्याचा या दैवताशीं संबंध असला पाहिजे; म्हणून मल्लारि मार्तंड जोडनांव पडलें असावें. शिवाय या दैवताचे भक्तगण पाहा ना. तेथें नेलहंडा नेण्याची पद्धत आहे. कोणी म्हणतात तो तेल्यांचा देव आहे. कोणी म्हणतात तो वीरांचा देव आहे. त्याची एक बायको बाणाई ही धनगर आहे, तेव्हां खंडोबा हा धनगरांचा देव आहे. मल्लारि मार्तंड हा महाराष्ट्रांतील ब्राह्मणांचेहि कुलदैवत आहे. एकूण काय ? महाराष्ट्रांतला हा एक लोकप्रिय देव आहे.

अनुक्रम ३२५२१ ...... वि: कृ: ... ... नों: दि: ... क्रमांक ...

पण आणखी थोडा विचार केला तर असेंहि दिसतें कीं हा केवळ महाराष्ट्रांतलाच असें नव्हे. कर्नाटकांतसुद्धां या देवाची भक्ति फार, या देवाचें माहात्म्य फार. मल्लारि म्हणजे– मल्लयांचा शत्रू. असें सांगतात कीं मल्लय म्हणजे पर्वतावर रहाणारे पूर्वीचे राक्षस लोक. त्यांनीं लोकांना त्रास दिला. त्यांना या देवानें ठार मारलें. म्हणून तो मल्लयारि अथवा मल्लारि, असें तिकडे कर्नाटकांत म्हटलें जातें. महाराष्ट्र व कर्नाटक यांमध्यें मल्लारीच्या भक्तांची परंपरा फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन्ही प्रांतांना जोडणारी ही देवता या प्रांतांच्या एकेकाळच्या एकीचें चिन्ह आहे हें खास !

केवळ कर्नाटक व महाराष्ट्र या दोन मोठ्या प्रांतांतील लोकांचें हें दैवत आहे, एवढेंच नाहीं, मुसलमानसुद्धां या दैवताचें नांव आपल्या मुलास ठेवीत असत. सुमारें अडीचशें वर्षांपूर्वी याच दैवताला मुसलमान मल्लूखान म्हणत आणि त्याचें दर्शन घेत. " कुठे जातां ? " " मल्लूखानाकडे ! "–म्हणजे मल्हारीकडे असें म्हटलें जात असे. विजापूरच्या सुलतानाच्या एका राजपुत्राचेंहि मल्लू असें नांव होतें. अर्थात् मुसलमानांचा हा देव आहे असा याचा अर्थ नव्हे; पण या देवाची लोकप्रियता केवढी मोठी होती, तें सांगायचें आहे.

महाराष्ट्रांत व कर्नाटकांत या लोकप्रिय देवाचें दर्शन अनेक ठिकाणीं घडतें. केवळ महाराष्ट्रांत पहातां : जेजुरी, निमगांव ( पुणें ), पाली–पेंबर ( उत्तर सातारा ), नळदुर्ग, अजदूर ( धाराशीव ), शेगुड ( नगर ), सातारें ( औरंगाबाद ); मालेगांव ( नांदेड ). आणि कर्नाटकांत : पैलारपूर पेंबर ( बीदर ); मंगसूळी ( बेळगांव ); मैलारलिंग ( धारवाड ); देवरगुड्ड किंवा गुडगुड्डापूर ( धारवाड ); मण्मैलार ( बेळगांव ). कुठेंहि जा ! मल्लारी मार्तंडाचें दर्शन घ्या ! आणि म्हणा " सदानंदाचा येळकोट ", " मल्लारि मार्तंडाचा येळकोट ! "

✦ ✦ ✦

## :१३: मल्हारी मार्तंडाचा येळकोट

जेजुरीची यात्रा संपवून आम्ही घरीं निघालों. जेजुरींत पाहिलेलीं विविध दृश्यें डोळ्यापुढें नाचत होतीं. ‘सदानंदाचा येळकोट’ ‘मल्हारि मार्तंडाचा येळकोट’ हे जयघोष कानांत घुमत होते. इतक्यांत रस्त्याच्या कडेला एकतारीवर भजन करणाऱ्या एका भक्ताकडे माझें लक्ष गेलें. त्याच्या तोंडून बाहेर पडणारा अभंग कानावर येत होता :


पंढरीसी राही रखुमाबाई। येथें म्हाळसा बाणाई ॥
तेथें विटेवरी उभा। येथें घोड्यावरी शोभा ॥
तेथें पुंडलिक निधान। येथें हेगडी प्रधान ॥
तेथें बुक्कियाचें देणें। येथें भंडार भूषणें ॥
तेथें वाहे चंद्रभागा। येथें जटीं वाहे गंगा ॥
तेथें मृदंग वीणा टाळ। येथें वाघ्या मुरळ्यांचा घोळ ॥

माझ्या डोळ्यासमोर जेजुरी होती. आणि अभंग ऐकतां ऐकतां माझ्या मनःचक्षूंसमोर पंढरी दिसूं लागली. पंढरी आणि जेजुरी महाराष्ट्रांतील बहुजनसमाजाच्या मनाची पकड घेतलेलीं हीं दोन पवित्र तीर्थक्षेत्रें. माझ्या डोळ्यासमोर मोरपिसांची टोपी घातलेला तो वासुदेव दिसूं लागला. त्याचे शब्द आठवले :

दान पावलें ऽ दान पावलें ऽ
पंढरीच्या विठ्ठलाला दान पावलें ऽ
जेजुरीच्या खंडोबाला दान पावलें ऽ

मी घरीं आलों. मुलांना भंडारा लावला, तळीचें खोबरें प्रसाद म्हणून दिलें. आणि म्हणालों, “सदानंदाचा येळकोट.”

मुलांनीं प्रतिसाद दिला, “मल्हारी मार्तंडाचा येळकोट.”



ग्रंथ क्रमांक ... ३०२ ... २५/७/५७

# संत-साहित्यांतील 'मल्हारी मार्तंड'

## वाघ्या आणि मुरळी

### ( वाघ्या )

अहं वाघा सोहं वाघा प्रेम नगारा वारी ।
सावध होउनि भजनीं लागा देव करा कैवारी ॥ १ ॥
मल्हारीची वारी । माझ्या मल्हारीची वारी ॥ धृ.॥
इच्छा–मुरळिस पाहुं नका तुम्हि पडाल नरक-द्वारीं ।
बोध-बुधली ज्ञान-दिवटी उजळा महाद्वारीं ॥ २ ॥
आत्मनिवेदन रोडगा निवतिल हारोहारीं ।
एकाजनार्दनी धन्य खंडेराव त्यावरि कुंचा वारी ॥ ३ ॥

### ( मुरळी )

निःसंग मुरळी झालें । या मालूचें घर रिघालें ॥ धृ.॥
गळां भक्तीची भांडारी । भावाचा कोटंबा करीं ।
विवेकाचि मागतें मी वारी । या संतांच्या चौंबा आलें ॥ या ॥१॥
चौ हात घांट वाजती । सोहं शब्द घोळ गर्जती ।
वाघ्या मुरळ्या या नाचती । गुरुकृपेचें अंजन ल्यालें ॥ या ॥२॥
वाज वैराग्य-तुणतुणं । तें कदा नव्हे बा सुनं ।
मन घुंगरूं वाजे छुनछुनं । नाजत जेजुरी गेलें ॥ या ॥ ३ ॥
गड देखीला जेजुरी । आत्मा नांदतो मल्हारी ।
जाउनि बसलें मी मांडीवरी । एका जनार्दन बोले ॥ या ॥ ४ ॥

—संत एकनाथ

## खंडोबाची आरती

पंचानन हयवाहन सुरभूषितलीळा ।
खंडामंडित दंडितदानव अवळीला ॥
मणिमल्ला मर्दुनियां जो धूसर पिवळा ।
करिं कंकण बाशिंगें सुमनांच्या माळा ॥ १ ॥
जयदेव जयदेव जय जय मल्हारी । हो राजा मल्हारी ।
वारी दुर्जन वारी तारी सज्जन तारी, निंदक अपहारी ॥जयदेव०॥धृ.॥

सुरवर संवर वर दे मजलागीं देवा ।
नाना नामें गाइन ही तुमची सेवा ॥
अघटित गुण गावया वाटतसे हेवा ।
फणिवर शिणला ते किति नर पामर केवा ॥ जयदेव० ॥२॥
रघुविर नामस्मरणें शंकर हृदयीं नीवाला ।
तो हा मदनांतक अवतार झाला ॥
यालागीं आवडीं भावें वर्णीला ।
रामी रामदासा जिवलग भेटला ॥ जयदेव० ॥ ३ ॥

—समर्थ रामदास

## मार्तंड–अष्टकांतील दोन श्लोक

त्रैलोकीं मणिमल्ल दैत्य सकलां आजिंक्य जाला मही ।
तेणें ब्राह्मण-यज्ञ-होमहवनें विध्वंसिलें सर्वही ॥
आला ते समयीं सदाशिव स्वयें सोडूनि ब्रह्मांड हो ।
तो हा पाहुं चला कृपाजलनिधी मल्हारिमार्तंड हो ॥ १ ॥
घेतां हा अवतार दुष्टदमनीं सद्‌भक्त संरक्षिले ।
गाई ब्राह्मण यज्ञ होमहवनें हे धर्म संस्थापिले ॥
गाती भक्त ऋषी मुनीजन सदा सत्कीर्ति उंदड हो ।
तो हा पाहुं चला कृपाजलनिधी मल्हारिमार्तंड हो ॥ २ ॥

—रंगनाथस्वामी निगडीकर

म. ग्रं. संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०९९२
शाखा (स्थळ प्रत)

( इतिहास-संशोधक श्री. ग. ह. खरे यांनीं जेजुरीविषयींची माहिती मोकळेपणानें दिल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. )

—लेखक.

REFBK-0010192